आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१६ मे २०२४ - गुरुवार

मुंबईत घाटकोपर परिसरात जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १६ झाली आहे. काल रात्री एका वाहनात आणखी दोन मृतदेह आढळले. याठिकाणचं बचाव कार्य पूर्ण झालं असून आज दिवसभरात राडारोडा हटवला जाईल, अशी माहिती मुंबईचे महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी आज दिली. याठिकाणचे इतर ३ विनापरवाना फलक काढायचं काम सुरू आहे. मुंबई शहरातल्या इतर अशाच फलकांची तपासणी सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

ठाणे महापालिका क्षेत्रातल्या सगळ्या होर्डिंग्जचे आठ दिवसात स्ट्रक्चरल ऑडिट करायचे आदेश महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी दिले आहेत. जाहिरात विभागाला महापालिका क्षेत्रातील अनधिकृत आणि धोकादायक होर्डिंगचे सर्वेक्षण करुन तात्काळ कारवाई करण्याचे आदेशही दिले आहेत.

**<><><><>**

निवडणूक आयोगाच्या स्थिर सर्वेक्षण पथकानं काल कल्याण रेल्वे स्थानकातून संशयास्पद रोकड जप्त केली. सामानाची तपासणी करताना एकाकडे सात लाख रुपयांची रोख रक्कम आढळली. त्याला या रकमेविषयी योग्य माहिती किंवा पुराव्याबाबत कागदपत्र देता आली नाहीत. ही रोकड जप्त केल्याची माहिती सर्वेक्षण पथक प्रमुखानी दिली.

**<><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या आगामी पाचव्या टप्प्याच्या तयारीच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या प्रशिक्षणाचं निवडणूक विषयक कर्मचाऱ्यांना झालेलं आकलन ऑनलाइन परीक्षेच्या माध्यमातून तपासण्यात आलं. दहिसर विधानसभा मतदारसंघात पार पडलेल्या निवडणूक विषयक अधिकाऱ्यांच्या दुसऱ्या प्रशिक्षण सत्रात एकंदर १ हजार ३शे ३३ अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण झालं.

**<><><><>**

नांदेड जिल्ह्यातल्या नायगाव तालुक्यात काल लालवंड इथं मंदिरात प्रसाद खाल्यामुळे शंभरहून अधिकजणांची प्रकृती बिघडली. स्थानिक रुग्णालयात अठरा जणांवर उपचार सुरु आहेत तर प्रकृती गंभीर झाल्याने आज शंभरहून अधिक जणांना नांदेड इथं उपचारासाठी हलवलं आहे. पोलिसांनी पुढील कारवाईसाठी प्रसादाचा नमुना तपासणीसाठी पाठवला आहे.

**<><><><>**

गडचिरोली जिल्ह्याच्या कोरची तालुक्यातील खसोळा येथील जंगलात तेंदूपाने तोडणारा हर्षद नरोटे हा १४ वर्षाचा मुलगा अस्वलानं केलेल्या हल्ल्यात जखमी झाला आहे. त्याला कोरचीच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

**<><><><>**

नंदुरबार जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षण अधिकारी सतिश चौधरी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने काल अटक केली. राज्य उत्पादन शुल्क विभागाने तक्रारदाराला दारुचा व्यवसाय करण्यासाठीचा परवाना नाकारला होता. व्यवसायासाठीच्या जागेपासून 75 मीटरच्या आत जिल्हा परिषदेची शाळा आहे. ही शाळा जीर्ण आणि बंद असल्याचं प्रमाणपत्र देण्यासाठी चौधरी यांनी लाचेची मागणी केली होती. तसंच एका संस्थेला शिक्षणाधिकार कायद्याच्या मान्यतेसंदर्भातलं काम करुन देण्यासाठीही चौधरी यांनी लाच मागितली होती. जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात लाच घेताना काल त्यांना अटक झाली.

**<><><><>**

सोशल सर्विस लिग आणि दामोदर हॉल प्रकरणात २८ मे पर्यंत योग्य तोडगा निघाला नाही तर उपोषणाचा इशारा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेनं दिला आहे. दामोदर हॉलच्या पाडकामाला स्थगिती असतांनाही सोशल सर्विस लिगने दामोदर हॉलचे पाडकाम सुरु ठेवल्यामुळे नाट्य परिषदेनं हा इशारा दिला आहे.

**<><><><>**

मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातल्या ६ कर्मचाऱ्याचा सुरक्षा पुरस्कारानं गौरव करण्यात आला. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करन यादव यांनी हे पुरस्कार प्रदान केले. नागेंद्र कुमार,वसंता राहुल दोडे, ट्रॅकमन दीपक शंकर, ज्ञानेश्वर पांडुरंग, दिनेश यादव यांना हे पुरस्कार देण्यात आले आहेत.

<><><><>

भारतीय फूटबॉलपटू सुनील छेत्री यानं आपली निवृत्ती आज समाजमाध्यमाद्वारे जाहीर केली. कुवेतशी कोलकत्यात ६ जून रोजी होणारा सामना त्याचा शेवटचा सामना असणार आहे. सुनील छेत्रीनं २००५ साली पाकिस्तानविरोधातल्या सामन्यात आंतरराष्ट्रीय फूटबॉलमध्ये पदार्पण केलं होतं. दीडशे आंतराराष्ट्रीय सामन्यांत ९४ गोल करण्याची कामगिरी त्याच्या नावावर आहे.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायजर्स हैदराबादचा सामना गुजरात टायटन्स बरोबर होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी स्टेडिअमवर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.  गुणतालिकेत हैदराबाद १४ गुणांसह चौथ्या आणि गुजरात टायटन्स ११ गुणांसह आठव्या स्थानावर आहे.

//<><><><>//